<u>प्रशासकीय मान्यता</u>
सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई येथील वीज मांडणीत APFC ५० KVAR SPFC पॅनल बसविणेबाबत..

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एचएचएम-२०१७/प्र.क्र.१३०/प्रशा-१
गोकुळदास तेजपाल रुगालय आवार, नवीन गो.ते.संकुल,
९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई.
दिनांक : १२ मार्च, २०१८.

वाचा : संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.:संवैशिवसं/सेंजॉरु/ नविन apfc पॅनल लावणे/ प-आय/ २९७२४/२०१७ ७५६, दिनांक १८.१.२०१७

शासन निर्णय :

सर ज.जी.समूह रुग्णालये, मुंबई अतंर्गत सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई येथील वीज मांडणीत APFC 50 KVAR SPFC पॅनल बसविणेबाबत खालील तक्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे येणाऱ्या एकूण रुपये ३,५०,४६५/- (रुपये तीन लक्ष पन्नास हजार चारशे पासष्ट फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	स्थापत्य दुरुस्ती बांधकामाचे नाव	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविलेली किंमत रुपये
१	Providing 50 KVAR APFC Electrical panel at Saint Georges Hospital, Fort, Mumbai	२,४४,१९५	३,५०,४६५
	एकूण	**२,४४,१९५**	**३,५०,४६५**

अटी व शर्ती :-

१) काम सुरु करण्यापूर्वी कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास संबंधित सक्षम प्राधिकारी/अभियंता (विद्युत) यांचे साक्षांकन घेण्यात यावे.

२) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

३) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधीत संस्था प्रमुखांनी करावी.

४) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिकदृष्टया मान्यता संबंधीत कार्यकारी अभियंता, सा.बां.विद्युत विभाग, यांच्याकडून करण्यात येईल. अशी तांत्रिक मान्यता करीत असताना संबंधीत संस्थेच्या अधीष्ठाता यांच्या सहमतीने तरतुदी अंतिम करण्यात याव्यात.

५) संबंधीत संस्थेच्या अधिष्ठातांनी या विभागाचे शासन परिपत्रक दिनांक ७.२.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे. संबंधीत संस्थेच्या अधिष्ठातांनी या विभागाचे शासन परिपत्रक दिनांक ७.२.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे.

२. सदर कामासाठी निधीची तरतूद झाल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करु नये. निधीची तरतूद झाल्यानंतर सदर काम हे खाली नमूद केलेल्या लेखाशीषाअंतर्गत मंजूर तरतूदीतून करण्यात येईल.

मागणी क्रमांक - एच-८
४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०३, वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन,
१०५-विषमचिकित्सा पंचवार्षिक योजनांतर्गत
(४२१० ००४१) ५३- मोठी बांधकामे

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकारी नियम पुस्तिका-१९७८ भाग-१, उप विभाग-५ अनुक्रमांक-५, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तीकेतील परिच्छेद क्रमांक १३४ नुसार

प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३) यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.८७/इमा-३, दिनांक २६.०२.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१२१११३७३०२०१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2018.03.12 13:17:28 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल-१ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) अधिष्ठाता, सर ज.जी.समूह रुग्णालय, मुंबई
४) अधिक्षक, सेंट जॉर्जेस रुग्णालय, फोर्ट, मुंबई
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई (इमारत-३) मंत्रालय, मुंबई.
६) कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, मुंबई
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९) निवडनस्ती (प्रशा-१).